# <u>नाशिक महानगरपालिका, नाशिक</u>
## जनसंपर्क विभाग
## <u>तपशिलवार निविदा सूचना- सन २०१६-१७</u>

**निविदा अटिशर्ती व इतर तपशिल.**

**१ अ) कामाचे नांव : नाशिक मनपा सार्वत्रिक निवडणुकीचे औचित्य साधुन मतदार नोंदणी बाबत व इतर प्रबोधनपर संदेशांचे चित्रपटगृहातुन जाहिरात प्रदर्शित करणे.**

**१ ब) निविदापुर्व अर्हता :**

१) जाहिराती क्षेत्रातील किमान एक **वर्षाचा** अनुभव असणे अनिवार्य आहे. तसा दाखला निविदेसोबत सादर करावा लागेल.

२) ज्या नावाने निविदा सादर करावयाची आहे. त्या नावाने शॉपॲक्ट सर्टिफिकेटची वैध प्रमाणित प्रत सादर करणे अनिवार्य राहील.

३) निविदाधारकाची मागील तीन वर्षाची सरासरी उलाढाल किमान **र.रु. ५ लक्ष** इतकी असावी. उलाढालीचे पुरावे दाखल आयकर रिर्टन फॉर्म अथवा सीए सर्टिफाईड ताळेबंद इत्यादी पुरावे तांत्रिक निविदे समवेत अपलोड करावेत.

**१ क) नाशिक महानगरपालिकेच्या जाहिराती प्रसिध्द करावयाच्या बाबींचा तपशिल** :

**(कामाचा तपशिल)**

| अ.नं. | तपशिल | अंदाजे दर र.रु. |
|---|---|---|
| १ | नाशिक मनपा क्षेत्रातील चित्रपटगृहात जाहिरात प्रदर्शित करणे. | १,९८,५००/- |

<u>**टिप**</u> : निविदा पत्रकात सदर मजकुरा व्यतिरिक्त अन्य मजकुर अनाधिकृतपणे नमुद करु नये. असा मजकुर

विचारात घेतला जाणार नाही.

**१ड) कामाचे अंदाजे प्राकलन : र.रु.** १,९८,५००/-

**१इ)** निविदेत नमूद केलेली संख्या/प्राकलन हे अंदाजे असून त्यात कमी-जास्त होण्याची शक्यता आहे.

२) **चित्रपटगृहात जाहिराती प्रर्दशित करणेची कार्य पध्दती :**

अ) मनपा कार्यालयाने दिलेल्या मसुदयाचे बिनचुक, आकर्षक,वाजवी आकाराचे डिझाईन तयार करणे (क्रिएटीव्ह करणे) व मनपाच्या वतीने सुचना / आदेशानुसार संबंधीत चित्रपटगृहात प्रर्दशित करणे.

ब) महानगरपालिकेच्या जाहिरातीचा मसुदा नाशिक महानगरपालिकेच्या कार्यालयातुन संकलित करणेची जबाबदारी निविदाधारकाची राहिल. त्यापुढील सर्व पुर्तता निविदा धारकाला करावी लागेल. त्या कामाचे वेगळे चार्जेस देण्यात येणार नाही.

ड) जाहिरातीचा मसुदा संबंधीत महानगरपालिका अधिका-याकडुन तपासुन घेणेची जबाबदारी एजन्सीची राहिल. त्यामध्ये चुक झाल्यास त्यामुळे होणा-या नुकसानीची भरपाई संबंधीत एजन्सीकडुन करुन घेणेत येईल व ती भरपाई करुन देणे एजन्सीवर बंधनकारक राहिल.

**३) निविदा बयाणा रक्कम व को-या निविदा पत्रकाची किंमत** :

अ) सदर निविदेपोटी निविदा बयाणा रक्कम रुपये ५,०००/- (अक्षरी रक्कम रुपये पांच हजार मात्र तसेच को-या निविदा पत्रकाची किमंत ररु.१०००/- विहित मुदतीत नामनपा.खजिना विभाग,राजीव गांधी भवन,शरणपुररोड,नाशिक येथे रोख्र भरावी.नाशिक महानगरपालिकेच्या नावाने निविदा बयाणा रकमेचा डिडी निविदे सोबत जोडल्यास ग्राहय धरण्यात येईल.

ब) जाहिरात मसुदा, स्वरुप व महत्व विचारात घेता अतिरिक्त सुरक्षा अनामत घेणे महानगरपालिकेस आवश्यक वाटल्यास त्याप्रमाणे सुरक्षा अनामत महानगरपालिकेकडेस भरणे निविदाधारकावर बंधनकारक राहील.

**४) जाहिरातीचा मसुदा चित्रपटगृहात प्रदर्शित करणेच्या कामाची मुदत व इतर तपशिल :**

जाहिरातीचा मसुदा एजन्सीस प्राप्त झालेनंतर तो मसुदा दुस-या दिवशी संबंधीत चित्रपटगृहात प्रदर्शित करणे बंधनकारक राहील किंवा कार्यादेशात नमुद केलेल्या दिवशी व वेळी जाहिरात चित्रपटगृहात प्रदर्शित करणे बंधनकारक राहिल.

**५) निविदा देकाराचा वैधता कालावधी** :

सदर निविदेची (बीड) मुदत निविदा सादर केलेपासून ९० दिवसापर्यंत राहील. तथापी मुदतवाढ देणे आवश्यक असल्यास मा. अतिरिक्त आयुक्त-१, मनपा नाशिक हे सदरची मुदतवाढ देण्यास सक्षम राहतील.

**६) निविदा सादरीकरणाचे व प्रि-बीड मिटींगसह इतर कार्यवाहीचे वेळापत्रक** :

अ) तपशिलवार निविदा नोटीस प्रसिध्दी दिनांक ०९/०९/२०१६.

ब) कोऱ्या निविदापत्रक विक्रीची मुदत दि.०९/०९/२०१६ ते दि.१९/०९/२०१६ पावेतो राहील.

क) दिनांक १५/०९/२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता मा. अतिरिक्त आयुक्त-१ अथवा उपआयुक्त(स्था.सं.क.) यांचे कार्यालय, राजीव गांधी भवन, शरणपुररोड, नाशिक येथे प्रि-बीड मिटींग ठेवण्यात येईल. सदर मिटींगला सर्व संबंधीतास उपस्थित राहता येईल. प्रि-बीड मिटींगमध्ये महानगरपालिकेने मान्य केलेल्या मुद्यांचा तपशिल

उक्त संकेतस्थळावर अलाहिदा प्रसिध्द करण्यात येईल. सदर प्रि-बीड मिटींगचे मुद्दे सर्व संबंधीत निविदाधारकांवर बंधनकारक राहतील.

ड) तांत्रिक निविदा व व्यापारी निविदा सादर करण्याची अंतिम मुदत दिनांक २०/०९/२०१६ रोजी दुपारी १.०० वाजेपावेतो राहील.

**ई) तांत्रिक निविदा उघडण्याचे ठिकाण व वेळ** :

उपआयुक्त (स्था.सं.क.) यांचे कार्यालय, राजीव गांधी भवन, शरणपुररोड, नाशिक येथे शक्य झाल्यास दिनांक २०/०९/२०१६ रोजी दुपारी २.०० वाजता तांत्रिक निविदा उघडण्यात येतील.

**फ) व्यापारी निविदा उघडण्याचे ठिकाण व वेळ** :

उपआयुक्त(स्था.सं.क.) यांचे कार्यालय, राजीव गांधी भवन, शरणपुररोड, नाशिक येथे शक्य झाल्यास दिनांक २०/०९/२०१६ रोजी दुपारी ३.०० वाजता अर्हताकारी निविदाधारकांच्या व्यापारी निविदा उघडण्यात येतील.

**७) निविदा देकार रद्द करणे** :

अ) सदर निविदेतील नमुद अटीशर्ती व अर्हता पुर्ण करु न शकलेल्या निविदाधारकांच्या व्यापारी निविदा न उघडता रद्द करण्यात येतील. तसेच सशर्त निविदा तात्काळ रद्द करणेत येतील.

ब) मनपाच्या संकेत स्थळावर निविदा अपलोड करतांना तांत्रिक निविदेच्या कागदपत्रांसमवेत व्यापारी निविदा पत्रक अनावधानाने किंवा हेतुपुरस्कर अपलोड केल्यास असे निविदापत्रक विचारात न घेता तात्काळ रदद् करणेत येईल.

**८) निविदा देकार सादर करण्याची पध्दती** :

**अ) निविदा भाग – १** (तांत्रिक निविदा / टेक्नीकल बीड))

यामध्ये खाली नमूद केलेले पुरावे/दाखले या पाकिटात ठेवुन सिलबंद करावेत.

१) निर्धारित निविदा बयाणा रक्कम मनपा खजिन्यात विहित मुदतीत भरलेची पावती.

२) अनुभवाचा दाखला/पुरावा.

३) शॉपअॅक्ट सर्टिफिकेटची वैध प्रमाणित प्रत.

४) निविदा सर्वसाधारण अटीशर्ती तसेच इतर अटीशर्ती मान्य असलेबाबत शिक्क्यानिशी स्वाक्षरी केलेला निविदा सर्वसाधारण अटीशर्तीचा फॉर्म.

५) निविदाधारकाची मागील तीन वर्षाची सरासरी उलाढाल किमान **रक्कम रुपये ५ लक्ष** इतकी असावी. उलाढालीचे पुरावे दाखल आयकर रिर्टन फॉर्म अथवा सीए सर्टिफाईड ताळेबंद किंवा उलाढालीचे प्रमाणपत्र इत्यादी पुरावे तांत्रिक निविदे समवेत अपलोड करावेत.

६) निविदाधारकाचे पॅन कार्डची सुस्पष्ट छायांकित प्रत.

**ब)** **निविदा भाग – २** (व्यापारी निविदा/कमर्शिअल बीड)

यामध्ये फक्त व्यापारी निविदा /कमर्शिअल बीड सादर करावे. निविदापत्रकात शिक्क्यानिशी दर नमूद करुन स्वाक्षरी करावी.सदरचे पाकिट सिलबंद करुन त्या पाकिटावर व्यापारी

निविदा/कमर्शिअल बीड असे नमुद करावे.

टिपः वरील प्रमाणे दोन्ही पाकिटे तिस-या पाकिटयात ठेवुन त्यावर कामाचे नाव नमुद करावे व सदरचे निविदा पाकिट सिलबंद करुन उपआयुक्त (स्था.सं.कर)यांचे कार्यालय राजीव गांधी भवन,शरणनपुररोड,नाशिक येथे विहित मुदतीत समक्ष सादर करावे.

**९) निविदा उघडण्याची पध्दती :**

प्रथम निविदा भाग-१ (तांत्रिक निविदा) उघडण्यात येतील. त्यामध्ये आवश्यक त्या कागदपत्रांची पुर्तता निविदाधारकाने केलेली आहे, अशी खात्री झाली तरच निविदा भाग-२ मध्ये सादर केलेली व्यापारी निविदा उघडण्यात येईल. अन्यथा त्या निविदाधारकाची निविदा रद्द समजण्यात येईल.

**१०) करारनामा करणे :**

अ) ज्या निविदाधारकाची संपुर्ण अथवा भागशः निविदा मंजूर होईल. त्या निविदाधारकास मनपाचे लाभात स्टँम्प पेपरवर प्राकलनाची रक्कम विचारात घेऊन योग्य ती स्टँम्प फी भरुन रितसर करारनामा करुन द्यावा लागेल व दोन सक्षम जामिनदार द्यावे लागतील.

ब) सदरच्या निविदेची मुदत/कालावधी वैध आहे तोपर्यंत त्या दराने पुरवठा करणे/काम करणे निविदाधारकावर बंधनकारक राहील.

**११) निविदा देकारांमध्ये सर्व करासह व अनुषंगीक खर्चासह दर नमूद असणे :**

सेवा कर, अनुषंगीक खर्च व इतर सर्व करासह निविदेतील दर नमूद करावयाचे आहे. इतर कोणत्याही टॅक्सची किंवा इतर कोणत्याही खर्चाची जबाबदारी महानगरपालिकेवर राहणार नाही. नाशिक महानगरपालिकेने सदर निविदा दरातील जाहिरातीचा मुळ खर्च, इतर कर, अनुषंगीक इतर खर्च वैगेरे बाबींच्या संपुर्ण तपशिलाची मागणी केल्यास तसा सविस्तर खुलासा सादर करणे निविदाधारकावर बंधनकारक राहील.

**१२) विलंब आकार :**

मुदतीत जाहिरात प्रदर्शित करणेच काम पुर्ण न केल्यास आणि विलंबाने जाहिरात प्रसिध्द करणेचे बाबतीत समाधानकारक खुलासा प्राप्त न झाल्यास अशा वेळेस प्रती जाहिरात प्रति दिन प्रति रक्कम रुपये १००/- या प्रमाणे दंड आकारणी करण्यात

येईल व सदरची रक्कम निविदाधारकाकडून वसुल करण्यात येईल. अशा प्रकरणी दंड आकारणी करण्याचा उपआयुक्त (स्था.सं.कर) यांचा निर्णय निविदाधारकावर बंधनकारक राहिल.

**१३) चित्रपटगृहात जाहिरात प्रदर्शित करणेचे काम मुदतीत व निर्धारित पध्दतीने न झाल्यास इतरांकडुन काम करुन घेणे :**

मुदतीत व अटीशर्तीप्रमाणे चित्रपटगृहात जाहिरात प्रदर्शित करणेचे काम संबंधीत एजन्सीने न केल्यास सदरचे काम निविदाधारकाचे जबाबदारीवर इतर ठिकाणाहून करुन घेण्यात येईल आणि अशा प्रकरणी महानगरपालिकेस मंजूर दरापेक्षा जास्त खर्च आल्यास तो निविदाधारकाकडून वसुल करण्यात येईल.

**१४) चित्रपटगृहात जाहिरात प्रदर्शित करणेचे काम बिनचुक, आकर्षक, वाजवी आकाराचे**

**डिझाईन तयार न केल्याने झालेल्या नुकसानीची वसुली निविदाधारकांकडुन करणे :**

नाशिक महानगरपालिका कार्यालयाकडुन प्राप्त झालेल मसुदयाचे बिनचुक आकर्षक वाजवी कराचे डिझाईन तयार करणे (क्रिएटीव्ह करणे), मनपा जनसंपर्क अधिका-याच्या सुचना व आदेशानुसार संबंधीत चित्रपट गृहात प्रदर्शित करणे बंधनकारक राहिल. सदर जाहिरात मसुदयाचे डिझाईन वाजवी आकारापेक्षा मोठे झाल्यास त्यामुळे होणा-या जादा खर्चाची/नुकसानीची वसुली संबंधीत एजन्सीकडुन करणेत येईल. तसेच महानगरपालिकेने अधिकृतरित्या दिलेल्या मसुदयाची जाहिरात क्रिएटीव्ह करतांना अगर प्रसिध्द करतांना चुक झाल्यास होणा-या नुकसानीची वसुली संबंधीत एजन्सीकडुन करण्यात येईल.

**१५) चित्रपटगृहात जाहिरात प्रदर्शित काम संबंधीत निविदाधारकांकडुन करणे महानगरपालिकेवर बंधनकारक नसणे :**

कोणताही जाहिरात मसुदा मंजूर केलेल्या दराने निविदाधारकामार्फतच **चित्रपटगृहात जाहिरात प्रदर्शित करणे** महानगरपालिकेवर बंधनकारक राहणार नाही व याबाबत निविदाधारकास काहीही भरपाई मागता येणार नाही.

**१६) चित्रपटगृहात जाहिरात प्रदर्शित करणेचे काम पुर्ण केलेनंतर कामाचे देयक अदा करणे :-**

अ) कार्यादेशानुसार **चित्रपटगृहात जाहिरात प्रदर्शित केलेनंतर** मागणी देयक जनसंपर्क अधिकारी यांच्याकडेस आवश्यक त्या कागदपत्रांसह पुढील कार्यवाहीसाठी सादर करावेत.

**ब)** शासन निर्णयाप्रमाणे /परिपत्रकाप्रमाणे जरुर ते टॅक्सेस देयकातुन कपात करुन

घेणेत येतील.

१७) **चित्रपटगृहात जाहिरात प्रदर्शित बाबतचे शासन निर्णय निविदाधारकावर बंधनकारक**

**असणे :-**

मा. शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाचे अंमलबजावणी करणे महानगरपालिकेवर बंधनकारक असल्यास त्याप्रमाणे तरतुदी निविदाधारकावर बंधनकारक राहतील व त्या तरतुदीनुसार कार्यवाही करणेची जबाबदारी निविदाधारकावर राहिल.

१८) **यशस्वी निविदाधारकास नाशिक महानगरपालिका क्षेत्रात संपर्क कार्यालय ठेवणे बंधनकारक असणे :**

नाशिक महानगरपालिकेचे **चित्रपटगृहात जाहिरात प्रदर्शित करणेसाठी** तातडीने पाठविणे आवश्यक असते. अशा वेळी जलद संपर्कासाठी यशस्वी निविदाधारकास नाशिक महानगरपालिका हददीमध्ये संपर्क कार्यालय ठेवावे लागेल. व त्या माध्यमातुन जाहिरात प्रसारणाचे कामकाज करणे निविदाधारकावर बंधनकारक राहिल.

१९) **विशेष तरतुद :**

अ) महानगरपालिकेचे हितार्थ कोणतेही जादा अट समावेश करण्याचा अधिकार मा. आयुक्त सो.,/ मा.अतिरिक्त आयुक्त सो., यांना राहील.

**ब)** कोणत्याही प्रकारची निविदा स्विकारणे अथवा नाकारणे याबाबतचे अंतिम अधिकार मा. अतिरिक्त आयुक्त (१) सो., मनपा नाशिक यांचेकडे राहतील.

**Sd/-**

**उपआयुक्त(स्था.सं.क.)**

**नाशिक महानगरपालिका,नाशिक**

२०) **निविदाधारकाचे परिचय पत्र व घोषणा पत्र.**

सदर निविदेतील अटी शर्ती मी /आम्ही वाचल्या असुन समजुन उमजुन घेतल्या आहेत.त्या अटी मला/आम्हाला मान्य आहेत. सदर अटीशर्तीस अधिन राहन आम्ही निविदेतील दर सादर करीत आहोत व माझे /आमचे परिचय पत्र खालीलप्रमाणे देत आहोत.

**अ) निविदाधारकाचे संपुर्ण नांव व पत्ता** -------------------------------------

-------------------------------------

-------------------------------------

-

**ब) मालकाचे / भागीदारांची नांवे व पत्ता** ----------------------------------

----------------------------------

----------------------------------

(भागीदारांची नावे जास्त असलेस त्यांची यादी स्वाक्षरीनिशी सोबत जोडली आहे.)

**क) ई-मेल आयडी** ----------------------------------------

**ड) संपर्क करण्यासाठी अधिकृत व्यक्तिचे नांव व संपर्क कार्यालयाचा पत्ता.**

--------------------------

--------------------------

**निविदाधारकाचे सही व शिक्का.**